# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १५/०३/२०२५ (शनिवार) सकाळ**

---

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पोस्टे कुही :—** सदर घटना पोलीस स्टेशन कुही अंतर्गत दिनांक १३/०३/२०२५ रोजी १०:०० दरम्यान डोडमा बसस्टॉप समोर घडली आहे. यातील मृतक महेश विनोद खंडाळे,वय १८वर्ष, रा दहीबाजार, नागपुर हा यातील आरोपी क्र. १ रोशन भय्याजी दांडेकर वय—३२ वर्षे, रा डोंगरगाव ता. कुही जि नागपूर याच्या कडे ड्रायव्हर म्हणुन कामाला होता. मृतकच्या हाताने आरोपी क्र—१ याने दिलेले २० हजार रूपये हरवीले. हरवीलेल्या २० हजारापैकी १६ हजार रूपये मृतक ने आरोपी क्र—०१ याला परत केले होते. उरलेल ४ हजार रूपये परत करायचे बाकी होते. सदर पैसे परत न केल्याबाबत मृतक आणि आरोपी क्र १ यांच्यामध्ये वाद होता. त्यामुळे यातील आरोपी क्र १) रोशन भय्याजी दांडेकर वय—३२ वर्षे ,२) कुनाल रमेश काकडे, वय—२५ वर्षे ,दोन्ही रा. डोंगरगाव ता. कुही जि नागपुर. आणि त्यांचा साथीदार ३) विधीसंघर्ष ग्रस्त बालक तिघेही रा. डोंगरगाव ता. कुही जि नागपूर यांनी मृतक महेश विनोद खंडाळे, वय १८ वर्षे, रा. दहीबाजार नागपुर याला डोडमा बसस्टॉप येथुन डोंगरगाव शेतशिवार येथे नेवुन त्याचा धारदार चाकुने खुन केला.

सदर प्रकरणी फिर्यादी युवराज प्यारेलाल टेकाम, वय २३ वर्षे ,रा.सावरा पोस्ट देवलापार,ता.रामटेक, जि. नागपूर. ह.मु आकाश काकडे यांचे शेतात नवरगाव ता.कुही जि. नागपूर, यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कुही येथे आरोपी नामे १) रोशन भय्याजी दांडेकर वय—३२ वर्षे ,२) कुनाल रमेश काकडे वय—२५ वर्षे ,दोन्ही रा.डोंगरगाव ता. कुही जि नागपुर. ३) विधीसंघर्ष ग्रस्त बालक तिघेही रा. डोंगरगाव ता. कुही जि नागपूर याच्या

विरूद्ध कलम १०३(१),१४० भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला असुन **नमुद आरोपी क्र १ आणि २ यांना पोलीसांनी अटक केली आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर